# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १९७** **दिनांक २०/०७/२०२१**

## फिल्म शुटींगच्या बहाण्याने मुलींना बोलावून वेश्या व्यवसाय करणा-या वेश्या दलालावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाने कारवाई करुन ०२ पिडित मुलींची केली सुटका.

मिरारोड पोलीस ठाण्याचे हद्दितील विदिशा शांती निकेतन को. ऑ. हौ. सोसायटी, मॅक्डोनाल्ड शॉप, लक्ष्मी आर्ट गॅलरीचे बाजुस, मिरा-भाईंदर रोड, मिरारोड पूर्व, येथे राहणारा इसम नामे परमानंद बालचंदानी, फिल्म प्रोडयुसर हे स्वतः पिक्चरच्या शुटींग/ ॲक्टरचे काम देण्याचे बहाण्याने मुलींना घरी बोलावून त्याचे साथीदार कन्हैय्यालाल बालचंदानी व महिला नामे श्रीमती वनिता इंगळे हे पुरुष गि-हाईकांकडून वेश्यागमनाचा मोबदला स्विकारुन वेश्यागमनासाठी मुली व रुम उपलब्ध करुन देतात अशी गोपनीय माहिती मिळाल्याने वपोनि. श्री पाटील यांनी पथकासह नमुद ठिकाणी बोगस गि-हाईक व पंच यांना पाठवुन सत्यता पडताळुन छापा टाकला असता, वेश्यादलाल कन्हैय्यालाल बालचंदानी व त्याचे साथीदारांनी बोगस गि-हाईकांकडून वेश्यागमनाचा मोबदला स्विकारुन वेश्यागमनासाठी मुलगी व रुम उपलब्ध करुन दिल्याचे निष्पन्न झाल्याने वेश्यादलाल कन्हैय्यालाल बालचंदाणी व त्याचे साथीदार परमानंद बालचंदानी, श्रीमती वनिता इंगळे यांना वेश्यगमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०२ पिडीत मुलींची सुटका करण्यात आली आहे. सदरबाबत वेश्यादलाल यांचेविरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I २४७/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०,३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. एस. एस. पाटील, पो.हवा. उमेश पाटील, विजय ढेमरे, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, मपोना यम्बर, कमल चव्हाण, चालक पोना गावडे, पो.शि. केशव शिंदे यांनी केली आहे.

………ooooooo………